# अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ बैठकीचे इतिवृत्त दि. १०/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | अल्पसंख्याक शाळेतील पटसंख्या २० ची अट शिथिल करणेबाबत. | संच मान्यतेबाबतची कार्यवाही ही संचालनालय स्तरावरुन करण्यात येते. संघटनेने याबाबत सविस्तर निवेदन शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावे. कार्यालयामार्फत ते वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल. | संघटनास्तरावर | -- |
| २ | विद्यार्थी वाढ झालेल्या शाळेत पायाभूत पदानुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्तीसाठी मान्यता मिळणेबाबत. | सन २०१९-२० च्या संचमान्यतेसाठी स्थगिती असली तरी अल्पसंख्याक संस्थांसाठी माहे-ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार शिक्षक भरतीसाठी कार्यवाही करावी. | संघटनास्तरावर | -- |
| ३ | प्राथमिक विभागामध्ये समायोजित झालेले अतिरिक्त माध्यमिक शिक्षकांना वेळोवेळी कामगिरीवर न काढणेबाबत. | जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये समायोजित झालेल्या माध्यमिक शिक्षकांना दर ६ महिन्यांना इतर प्राथमिक शाळांवर पाठविणेत येत असल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले.<br>माध्यमिक शाळांमधून प्राथमिक शाळेत समायोजित झालेले शिक्षक हे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर कार्यरत असल्यामुळे व मुख्य कार्यकारी अधिकारी हे नियुक्ती प्राधिकारी असल्यामुळे सदरची बाब शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाही. | -- | -- |
| ४ | 'क' संवर्गात समाविष्ट झालेल्या पदवीधर शिक्षकांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देताना दि. ०५/०२/१९८८ च्या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास शिक्षणाधिकारी यांना मार्गदर्शन करणेबाबत. | महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार मुख्याध्यापक पदासाठी शैक्षणिक पात्रता ही बी.एड. आहे.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी बी.ए.,डी.एड. असलेल्या शिक्षकांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती दिली असल्यास अशा प्रकरणांची माहिती तात्काळ घेवून शिक्षण उपसंचालक कार्यालयास कळवावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ५ | माध्यमिक शाळेतील पुस्तके माध्यमिक विभागाकडूनच पुरविणेबाबत. | माध्यमिक विभागाला मागणीनुसार पुस्तके मिळत नसल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले.<br>सर्व शिक्षा अभियानांतर्गत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येते. तालुका पातळीवर गटशिक्षणाधिकारी हे प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक साठी मागणीनुसार प्राप्त झालेल्या पाठ्यपुस्तकांचे वितरण करतात. | -- | -- |
| ६ | प्राथमिक शाळांप्रमाणे माध्यमिक शाळाच्या | धोणात्मक बाब आहे. | शासन स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांनाही शासनाकडून गणवेश मिळणेबाबत. | | | |
| ७ | इ. ८ वी अरबी विषयांची पुस्तके उपलब्ध करुन देणेबाबत. | बालभारती कडून इ. ८ वी अरबी विषयांच्या पुस्तकांची छपाई करण्यात येत नाही. | शासन स्तरावर | -- |
| ८ | डी.सी.पी.एस. धारकांची दोन हप्त्यांऐवजी एक हप्ता कपात होणेबाबत व त्यांच्या कपातीचे हिशेबपत्र कर्मचाऱ्यांना देणेबाबत. | थकित डी.सी.पी.एस. हप्त्याची वसूली करणे अनिवार्य आहे. | -- | -- |
| ९ | शालार्थ क्रमांक सर्व शाळांना लवकरात लवकर मिळणेबाबत | शालार्थ आयडी च्या प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत विधानसभा निवडणूकांच्या कामकाजात अधिकारी वर्ग व्यस्त असल्यामुळे निवडणूकीनंतर शालार्थ छाननी समितीच्या बैठकीचे आयोजन करुन शालार्थ आयडी च्या प्रलंबित प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येईल. | शिक्षण उपसंचालक स्तरावर | -- |
| ➢ | **सर्वसाधारण सूचना :-** | | | |
| | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येतील. | संघटना स्तरावर | -- |

(सत्यवान सोनवणे)
**शिक्षण उपसंचालक**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**